मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

९८८९

IRBK-0109889

# गणपतीची कथा

म. ग्रं. सं. वाचनालय, ठा
विषय बा० वा०
दा. क्र. ८८८२



८८८५ ३५०५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

11 FEB 1978

13 AUG

IRBK-0109889

[कृ. मा. प.]

॥ श्री ॥

# गणपतीची कथा

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय

लेखक : भं. सां. अग्निहोत्री

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बा. क्र. ........ नों. दि. ..............
वि. ........ क्र. ..............

मूल्य चालीस नवे पैसे

ग्रंथप्रकाशक व ग्रंथविक्रेते
**श्रीराम प्रकाशन**
ठाकुरद्वार, मुंबई क्रमांक २.

प्रणम्य शिरसा देवं गौरीपुत्रं विनायकम्
भक्तावासं स्मरेन्नित्यमायुःकामाय सिद्धये

## गणपतीचीं नांवें

विष्णुसहस्रनामाप्रमाणें गणपतिसहस्रनामही आहे. तथापि गणपतीचीं पुढील कांहीं नांवें जास्त प्रसिद्ध आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ गणेश | २ गणपति | ३ गजानन |
| ४ विनायक | ५ भालचंद्र | ६ मयूरेश्वर (मोरेश्वर) |
| ७ वक्रतुंड | ८ सिंदुरवदन | ९ लंबोदर |
| १० धूम्रवर्ण | ११ एकदंत | १२ विकट |
| १३ सुमुख | १४ कपिल | १५ गजकर्णक |
| १६ विघ्ननाशक | १७ गणाधिप | १८ धूम्रकेतु |
| १९ गणाध्यक्ष | २० महोत्कट | २१ व्यालबद्धोधर |
| २२ कालानलप्रशमन | २३ हेरंब | २४ वरद |
| २५ धरणीधर | २६ गणेश | |



आपण दरवर्षी भाद्रपद शुद्ध चतुर्थीला, 'गणपति बापा मोरया !' असा जयजयकार करीत गणपतीची मूर्ति वाजतगाजत घरीं आणतों. दहा दिवस पूजा - आरती - प्रसादासह उत्सव करतो. अनंत-चतुर्दशीला, 'पुढच्या वर्षी लौकर या !' असें म्हणून ती मूर्ति वाजतगाजतच तलाव, नदी किंवा समुद्र अशा ठिकाणीं नेतों आणि तिचें विसर्जन करतों. आपल्या देवघरांतील पंचायतनांत गणपति असतोच.

गणपतीच्या जन्माची गोष्ट तुम्हांला माहीत असेलच.

## गणपतीची कथा : १ :

एकदां पार्वतीनें आपल्या अंगाच्या मळापासून एक मूर्ति बनविली, तिच्यामध्यें प्राण घातला आणि तिला स्नानगृहा-बाहेर ठेवून बजावलें, "कुणालाही आंत सोडूं नकोस." तेवढ्यांत शंकर आले. पार्वतीच्या त्या पहारेकऱ्यानें त्यांना अडविलें. शंकराला भयंकर राग आला आणि त्यांनीं एकदम आपल्या त्रिशुळानें त्याचें मस्तकच उडविलें. पार्वती बाहेर आली आणि रडत म्हणूं लागली, "तो माझा मुलगा आहे! त्याला पुनः जिवंत करा!" पण, त्रिशुळानें उडविलेलें मस्तक कुठेंच सांपडेना. म्हणून शंकरांनीं एका मेलेल्या हत्तीचें तोंड त्या मूर्तीला लावून पुनः जिवंत केलें. गज म्हणजे हत्ती. आनन म्हणजे तोंड. हत्तीचें तोंड असलेला तो गजानन. शंकरांनीं त्याला आपल्या सर्व गणांचा मुख्य नेमलें म्हणून त्याचें नांव गणपति किंवा गणेश.

कोणत्याही चांगल्या कार्याच्या सुरुवातीस गणेशाचें स्मरण केलें कीं कार्य निर्विघ्न पार पडतें म्हणून त्याला विघ्नहर्ता म्हणतात.

राक्षसांचा नाश करण्यासाठीं गणपतीनें वेळोवेळीं अवतार घेतलेले आहेत.

* * *

## महोत्कट : २ :

अंगदेशांत रौद्रकेतु नांवाच्या ब्राह्मणाला दोन जुळीं मुलें होतीं. एकाचें नांव देवांतक. दुसऱ्याचें नरांतक.

देवांतक–नरांतकांनीं शंकरांची आराधना करून त्यांना प्रसन्न करून घेतलें. त्यांनीं वर मागितला : "देव, मनुष्य, यक्ष, गंधर्व, पिशाच्च, राक्षस किंवा श्वापदें यांपैकीं कोणापासूनही; दिवसा किंवा रात्रीं, शस्त्रानें किंवा अस्त्रानें आम्हांला मरण नसावें. स्वर्ग, पृथ्वी आणि पाताळ या तिन्ही लोकांचें राज्य आम्हांला मिळावें."

शंकर म्हणाले, "तथास्तु!"

शंकरांचा वर मिळतांच देवांतकानें स्वर्गावर स्वारी करून इंद्राचा पराभव केला. ब्रह्मलोकावर चाल करून जाऊन ब्रह्मदेवालाही पळवून लावलें. विष्णूंचा पराभव करून वैकुंठही जिंकला.

नरांतकानें सर्व पृथ्वी जिंकून पाताळांतील नागांवरही तो राज्य करूं लागला.

जगांतील सर्व राक्षस या दोघां भावांच्या छत्राखालीं जमा झाले. त्यांच्या राज्यांत सर्व धर्मकृत्यें बंद पडलीं. प्रजा अत्याचारांनीं जर्जर होऊं लागली.

तेव्हां, या दुकलीपासून तिन्ही लोकांची सुटका करण्या-साठीं गणपतीनें कश्यप ऋषींची पत्नी आणि देवांची माता आदिती हिच्या पोटीं ‘महोत्कट’ या नांवानें जन्म घेतला.

कृष्णाला बालपणींच ठार करण्यासाठीं कंसानें जसे प्रयत्न केले तसेच प्रयत्न देवांतक – नरांतकांनीं महोत्कटाला मारण्यासाठीं केले.

महोत्कट पाळण्यांत असतांनाच विरजा नांवाची राक्षसी तिथें आली आणि एकादें द्राक्ष पटकन् तोंडांत टाकावें तसें तिनें त्या बालकाला गिळून टाकलें. पण तिच्या पोटांत जातांच महोत्कट भराभर वाढूं लागला. तसतसें राक्षसीचें पोट फुगूं लागलें. अखेर महोत्कट इतका वाढला कीं राक्षसीचें पोट फुटलें आणि ती मरून पडली.

महोत्कटाच्या पांचव्या वर्षी कश्यप ऋषींनीं त्याची मुंज मोठ्या थाटांत केली. त्या वेळीं विघात, पिंगाक्ष, पिंगल, विशाल आणि चपल ह्या पांच राक्षसांनीं ब्राह्मणांचीं रूपें घेऊन बटूवर अक्षता टाकण्याच्या मिषानें अस्त्रें टाकण्यास सुरुवात केली. तेव्हां महोत्कटानें फक्त पांच तांदूळ मंत्रून त्या राक्षसां-वर टाकून त्यांचा नाश केला.

## महोत्कटाचें काशीस प्रयाण

महोत्कट सात वर्षांचा झाला तेव्हां एक दिवस काशी-राजा आपल्या मुलाच्या लग्नासाठीं ऋषींना बोलावण्यासाठीं

आला. पण कश्यप म्हणाले, " मी सध्यां यज्ञांत गुंतलेलों आहे. माझ्या या मुलाला घेऊन जा. "

काशीला येत असतां वाटेंत महोत्कटानें धूम्राक्ष नांवाच्या राक्षसाचा वध केला. जघन आणि मनु या त्याच्या मुलांना तर महोत्कटानें नुसता जोराचा श्वास सोडून थेट नरांतकाच्या राजधानीपर्यंत उडवून लावलें. ते राक्षस ज्या घरांवर पडलें त्यांचा साफ चक्काचूर झाला.

मग, नरांतकानें एका मागून एक राक्षस महोत्कटाला ठार मारण्यासाठीं पाठविण्याचा सपाटा लावला.

एका रात्रीं काशींतील सर्व लोक झोपलेले असतांना ज्वालामुख, दारुण आणि व्याघ्रमुख हे तीन राक्षस नगरांत शिरले. ज्वालामुखानें वणव्याचें रूप घेऊन नगर जाळायला सुरुवात केली. दारुण वाऱ्याचें रूप घेऊन आग भडकावूं लागला. आणि आगींतून वांचण्यासाठीं लोक जसे घराबाहेर पडूं लागले तसा व्याघ्रमुख भयंकर जबडा पसरून सर्वांना गिळूं लागला. तेव्हां महोत्कट प्रथम ज्वालामुख आणि दारुण यांचा निकाल लावून व्याघ्रमुखाच्या तोंडांत शिरला. आंत जातांच त्यानें राक्षसाच्या शरीराचे, कलिंगड कापावें असे दोन तुकडे केले. बाहेर आलेले लोक बघतात तर काशीनगर अगदीं पूर्वी जसें होतें तसेंच दिसून आलें. हा चमत्कार पाहून राजासह सर्व प्रजेची महोत्कटावर जास्तच भक्ति जडली.

थोड्याच दिवसांनीं कूपक आणि कंदर या राक्षसांना नरांतकानें पाठविलें. कूपकानें राजवाड्यापाशीं विहिरीचें रूप घेतलें आणि कंदर मुलाच्या रूपानें महोत्कटाशीं खेळत खेळत त्याला विहिरीपाशीं घेऊन आला. संधि साधून महोत्कटाला कंदरानें विहिरींत ओढून न्यावें अ— तळाशीं येतांच तिथें कूपकानें प्रचंड बेडूक बनून त्याला गिळावें असा त्यांचा बेत होता. पण, बेडूक बनलेल्या कूपकाच्या जबड्यां-तून महोत्कट निसटला आणि कंदरच सांपडला. कूपक कंदरा-लाच गिळूं लागला तेव्हां कंदरानें मुलाचें रूप टाकून स्वतःचें मोठें रूप घेतलें. त्याबरोबर कूपकाचें तोंड फाटलें. मग, ते राक्षस आपसांतच लढूं लागले आणि लढतां लढतां दोघेही एकमेकांकडून मारले गेले.

## नरांतकाचा वध

महोत्कटाला मारण्यासाठीं ज्याला ज्याला पाठवावें तो तो उलट मारलाच जातो हें पाहून स्वतः नरांतकच काशीवर चालून आला.

तेव्हां महोत्कटानें एक भयंकर पुरुष उत्पन्न केला आणि “ नरांतकाच्या सर्व सैन्याला खाऊन टाक आणि त्याला पकडून आण ” अशी आज्ञा केली. त्या पुरुषानें डोळ्याचें पातें लवतें न लवतें इतक्या थोड्या वेळांत आपल्यावर सोपविलेली कामगिरी पार पाडली.

या प्रकारामुळें नरांतक मनांतून घाबरून गेला तरी पण, एकटाच महोत्कटाशीं लढूं लागला.



नरांतकाचा वध

या युद्धांत, महोत्कटानें नरांतकाचे हात तोडावेत, पण लगेच, झाडाला फांद्या फुटाव्यात तसे नवे हात त्याच्या शरीरांतून बाहेर यावेत; शिर तोडावें तर त्या जागीं नवें डोकें यावें असा प्रकार होऊं लागला. तेव्हां अखेर महो-

त्कटानें राक्षसावर मोहिनी घातली. आपल्या पुढ्यांत असलेला बालक स्त्री आहे कीं पुरुष, जिवंत प्राणी कीं निर्जीव वस्तु हेंच नरांतकाला उमजेनासें झालें. त्याची परिस्थिति वेड्यासारखी झाली. लगेच महोत्कटानें प्रचंड रूप घेऊन पायाच्या आंगठ्यानें चिरडूनच नरांतकाला ठार केलें.

## देवांतकाचा वध

नरांतक मरण पावतांच त्याचें मस्तक रौद्रकेतूच्या घराच्या आंगणांत जाऊन पडलें. तें मस्तक घेऊन रौद्रकेतु देवांतकाकडे गेला. भावाच्या मृत्यूचा सूड घेण्यासाठीं देवांतकानें तावडतोब काशीवर स्वारी केली.

बाल महोत्कटानें मोठें रूप घेतलें आणि अष्टसिद्धींकडून असंख्य सैनिक उत्पन्न केले. पण लढाईंत देवांतकानें आठही सिद्धींचा पराभव केला. तेव्हां बुद्धि पुढें झाली आणि तिनें देवांतकाच्या सैन्याचा पाडाव करून स्वतः त्याला शेंडी धरून महोत्कटापुढें आणलें. पण संधि साधून देवांतक निसटला.

महोत्कटाचा पराभव करण्याचें सामर्थ्य मिळावें म्हणून देवांतकानें शंकराचें अनुष्ठान केलें. त्यानें स्वतःचें मस्तक कापून होमकुंडांत त्याची आहुती दिली. शंकर प्रसन्न होऊन त्यांनीं देवांतकाला पुनः जिवंत केलें. होमकुंडांतून

एक काळ्या रंगाचा घोडा वर आला. त्या घोड्यावर स्वार होऊन देवांतक पुनः युद्धाला निघाला.



अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

देवांतकाचें अनुष्ठान

या युद्धांत देवांतकानें महोत्कटाच्या सैन्याचा खूपच धुव्वा उडविला. मोहनास्त्र टाकून आठहि सिद्धींना गाढ झोप आणली. तेव्हां महोत्कटानें घंटास्त्र आणि खगास्त्र अशीं दोन अस्त्रें सोडलीं. घंटास्त्रामुळें जिकडे तिकडे कानठळ्या बसवि-

णारा घंटानाद सुरू होतांच अष्टसिद्धींसह सर्व सैन्य जागें झालें. खगास्त्रामुळें लक्षावधि भयंकर पक्षी उत्पन्न झाले आणि त्यांनी राक्षस सैन्याला गिळण्याला सुरुवात केली. महोत्कटानें पहाट होईपर्यंत युद्ध चालू ठेवलें आणि पहाट होतांच मोहनास्त्रानें देवांतकाला गुंगवून झटकन् उचलून स्वतःच्या मांडीवर घेतलें. तेवढ्यांत तो सावध झाला आणि महोत्कटाच्या एका दांताला धरून लोंबकळूं लागला. राक्षसाच्या भारानें तो दांत तुटला. महोत्कटानें चपळाईनें तोच दांत हातीं घेऊन प्रचंड वेगानें राक्षसाच्या डोक्यावर मारला. देवांतकाच्या मस्तकाचे तुकडे तुकडे झाले.

* * *

## सिंधु दैत्याची गोष्ट : ३ :

मिथिल देशाचा राजा चक्रपाणी आणि पत्नी उग्रा यांना सूर्योपासनेमुळें एक मुलगा झाला. त्याचें नांव सिंधु.

या सिंधूनें तपश्चर्या करून सूर्याला प्रसन्न करून घेतलें आणि "मला अमरत्व मिळावें." असा वर मागितला. तेव्हां सूर्य म्हणाला, "जन्मास आलेला कुणीहि अमर होऊं शकत नाहीं. पण, मी तुझ्या पोटांत अमृत ठेवतों. त तिथें असेपर्यंत तूं मरणार नाहींस."

एवढ्या वरदानानेंहि सिंधु माजला. सारी पृथ्वी जिंकून त्याचें समाधान झालें नाहीं. त्यानें स्वर्गावर स्वारी केली. इंद्राचा पराभव झाल्यावर विष्णु सिंधूशीं लढण्यासाठीं आले; पण त्यांचाहि पराभव सिंधूनें केला, आणि आपल्या गंडकी नांवाच्या राजधानींत त्यानें विष्णूंना व इतर देवांना बंदिस्त करून ठेवून सर्वत्र दवंडी फिरविली, "आजपासून कोणीहि देव, ब्राह्मण किंवा गायी यांची पूजा न करतां माझीच पूजा करावी!"

## मयूरेश्वर

एकदां भाद्रपद शुद्ध चतुर्थीच्या दिवशीं पार्वतीनें गणपतीची मातीची मूर्ति तयार करून तिची पूजा केली तेव्हां ती मूर्ति सजीव होऊन म्हणाली, "सिंधु दैत्याचा नाश करण्यासाठीं मी हा अवतार घेतला आहे!"

या अवतारांत गणपतीचें वाहन मोर असल्यामुळें त्याला मयूरेश्वर हें नांव पडलें.

हा गणेशजन्म झाला तेव्हां "सिंधु! तुला ठार मारणारा जन्माला आला आहे!" अशी आकाशवाणी झाली.

अर्थातच मग, सिंधूनें मयूरेश्वराचा नाश करण्यासाठीं एका मागून एक राक्षस पाठवायला सुरुवात केली असल्यास नवल नाहीं. एक राक्षस गिधाडाच्या रूपानें आला, दुसरा मांजराच्या रूपानें. कुणी उंदराच्या रूपाचे. पण, बाल मयूरेश्वरानें त्या सर्वांचा नाश केला.

व्योमासुर नांवाच्या राक्षसानें झाडांत प्रवेश केला आणि तें झाड मयूरेश्वराच्या अंगावर पाडून त्याला चिरडण्याचा प्रयत्न केला. पण बाल मयूरेश्वरानें तें झाड वरच्यावर धरून उंच फेकलें. झाड जमिनीवर कोसळतांच राक्षस मरण पावला.

एक राक्षस अजगर बनून मयूरेश्वराला खाऊं लागला तेव्हां त्यानें जबड्यांत शिरून राक्षसाला चिरून टाकलें.

एकदां मंचकासुर नांवाच्या राक्षसानें, गजाननासह पार्वती ज्या पलंगावर निजली होती त्या पलंगांतच शिरून आकाशांत भरारी मारली; पण मयूरेश्वरानें आपल्या पायांनीं त्याला लाथा मारून खालीं पाडलें. राक्षसाचा चेंदामेंदा झाला.

मयूरेश्वराचें वय विवाहाला योग्य झाल्यावर ब्रह्मदेवाच्या कन्या सिद्धि आणि बुद्धि यांच्याशीं त्याचा विवाह घडवून आणण्याच्या उद्देशानें शंकर त्याला घेऊन, ब्रह्मदेवादि देव बंदिस्त असलेल्या सिंधूच्या गंडकी नगरीकडे जावयाला निघाले.

गंडकी नगरीपाशीं आल्यावर प्रथम नंदीला सिंधूकडे शिष्टाईसाठीं पाठविण्यांत आलें; पण सामोपचाराच्या गोष्टी धुडकावून लावून सिंधूनें युद्धाचीच तयारी केली.

या युद्धांत प्रारंभीं सिंधूनें वीरभद्र, पुष्पदंत, कार्तिकेय प्रभृतींची त्रेधा तिरपीट उडविली; पण अखेर मयूरेश्वरानें आपल्या परशूनें सिंधूचा एक कानच तोडला. मयूरेश्वरा`

मोहिनी मंत्र टाकल्यामुळें सिंधूला जिकडे तिकडे अनेक गणेश दिसूं लागले. तेव्हां तो घाबरून पळून गेला.

पुनः दुसऱ्या दिवशीं सिंधूनें चवताळून मयूरेश्वराच्या सैन्यावर हल्ला चढविला; पण अखेर राक्षस सैन्याचीच वाताहत झाली. तिसऱ्या दिवशीं सिंधूचे धर्म आणि अधर्म हे मुलगे कार्तिकेयानें मारले.

मुलांच्या मृत्यूचा सूड घेण्यासाठीं युद्धभूमीवर आलेल्या सिंधूनें अग्न्यस्त्राचाच एकदम प्रयोग केला;पण मयूरेश्वरानें उत्पन्न केलेल्या एका भयंकर पुरुषानें तें अस्त्र तर गिळून टाकलेंच पण राक्षसांचें सैन्यहि गिळण्याचा सपाटा लावला. तेव्हां सिंधु कपड्यांचेंहि भान न राहवून राजधानींत पळून गेला.

दुसऱ्या दिवशीं मयूरेश्वराच्या सैन्यानें राजधानीवरच हल्ला केला. भृंगीनें राजवाड्याच्या सभामंडपावर उडी मारली तसा सभामंडप कोसळला. तेव्हां पुनः एकदां चवताळून सिंधु युद्धासाठीं बाहेर पडला.

या वेळीं स्वतः मयूरेश्वरानेंच सिंधूला तोंड देण्याचें ठरविलें. दोघे समोरासमोर येतांच मयूरेश्वरानें विराट् स्वरूप धारण केलें. त्याचें मस्तक आकाशाला भिडलें होतें. तें रूप बघूनच सिंधु बेशुद्ध झाला.

पण पुनः सावध होऊन सिंधु लढण्यासाठीं सज्ज झाला

तेव्हां मयूरेश्वरानें परशूवर मंत्राचा प्रयोग करून तो परशु अचूकपणें सिंधूच्या बेंबीवर मारला. त्याबरोबर सूर्यानें त्याच्या पोटांत ठेवलेलें अमृत बाहेर पडलें आणि राक्षसानें रक्त ओकत प्राण सोडला.

सिंधूच्या वधानंतर कांहीं कालानें मयूरेश्वरानें अवतार संपविण्याची इच्छा बोलून दाखविली. त्या वेळीं पार्वती रडूं लागली तेव्हां मयूरेश्वर म्हणाला, " माते, दुःख करूं नकोस. पुढें सिंदुर नांवाचा दैत्य होणार आहे. त्याचा वध करण्यासाठीं मी तुझ्याच पोटीं जन्म घेईन. "

## सिंदुर दैत्याचा जन्म

एकदां ब्रह्मदेव झोपेंतून जागे होत असतांना त्यांना जांभई आली. तेव्हां त्यांच्या उघडच्या तोंडांतून एक बालक बाहेर पडलें; त्या बालकाचा वर्ण तांवडा होता. ब्रह्मदेव त्याला म्हणाले, " तुला तिन्ही लोकांत वाटेल तिथें जातां येईल. तुला कुणाचीहि भीति नाहीं. तूं ज्याला मिठी मारशील तो तत्काळ ठार होईल ! तुझा रंग तांवडा म्हणून तुझें नांव सिंदुर ठेवतों. "

ब्रह्मदेवाच्या बोलण्याचा खरेखोटेपणा पडताळून बघण्यासाठीं त्या मुलानें ब्रह्मदेवांनाच मिठी मारण्यासाठीं हात पसरले. तेव्हां ब्रह्मदेवानें त्याला शाप दिला, "माझ्या वरानें तूं उन्मत्त झालास म्हणून दैत्य होशील आणि गजानन अवतार घेऊन तुझा नाश करील. "

तो दैत्य ब्रह्मदेवाचा पाठलाग करूं लागला. तेव्हां ब्रह्मदेव वैकुंठाला पळून गेले. सिंदुर त्यांच्या मागोमाग गेला तेव्हां विष्णु त्याला म्हणाले, "तुझी ताकद असेल तर महापराक्रमी शंकरांबरोबर युद्ध करायला जा!"



सिंदुर दैत्याचा जन्म

सिंदुर लगेच कैलासाकडे रवाना झाला. शंकरांशीं युद्ध करतां करतां त्यांना मिठी मारण्याचा त्यानें प्रयत्न केला. तेव्हां गजाननानें अदृश्य रूपानें परशूचा वार करून शंकरांवरचें संकट टाळलें.

सिंदुराच्या नाशासाठीं गणपतीनें घेतलेला अवतार त्यानें गजानन या नांवानें घेतला. या अवतारांत त्याचें वाहन मूषक म्हणजे उंदीर हें होतें.

जन्मतांच गजाननानें शंकरांना सांगितलें, “वरेण्य नांवाच्या राजाच्या पुष्पिका राणीनें बारा वर्षें माझी उपासना केली म्हणून तिच्या घरीं बालरूपानें राहण्याचें मीं वचन दिलें होतें. म्हणून आतांच मला तिच्यापाशीं नेऊन ठेवा.”

त्याप्रमाणें शंकरांनीं बालगजाननाला नंदीबरोबर देऊन रवाना केलें.राणी जागी झाली तेव्हां तिला आपले शेजारीं चार हात व सोंड असलेलें मूल दिसलें. असें विद्रूप मूल घरांत ठेवूं नये असा सल्ला राजाला मंत्र्यांनीं दिल्यावरून राजानें मुलाला अरण्यांत नेऊन टाकण्याची व्यवस्था केली. गजाननाला जिथें टाकलें तिथेंच जवळ पराशर ऋषींचा आश्रम होता. तें मूल त्यांच्या नजरेस पडलें. त्यांनीं त्याचें लालनपालन करण्यासाठीं त्याला आपल्या घरीं नेलें.

इकडे सिंदुर आपल्या राजसभेंत बसला असतां आकाशवाणी झाली, “तुझा प्राण घेणारा पार्वतीच्या पोटीं जन्माला आलेला आहे!” त्याबरोबर सिंदुर तडकाफडकीं उठून कैलासाकडे रवाना झाला. तिथें पार्वतीपाशीं अंथरुणावर मूल दिसलें नाहीं तेव्हां त्यानें पार्वतीला ठार करण्यासाठीं शस्त्र उचललें. तेवढ्यांत तिथें बालगजानन दिसूं लागला. मूल दिसतांच सिंदुरानें त्याला उचललें आणि आकाशांत उड्डाण

केलें. त्या बालकाला समुद्रांत बुडविण्याचा त्याचा विचार होतो; पण वाटेंत गजाननानें आपलें वजन इतकें वाढविलें कीं, सिंदुराला तें वजन पेलवेना. खाली नर्मदा नदी वाहत होती, त्या नदींतच त्यानें बालकाला टाकून दिलें. नदींत पडल्यामुळें त्याचें जें रक्त सांडलें त्यामुळें नदींतील गोटे लाल रंगाचे झाले. त्यांनाच नर्मदेंतील गणपति म्हणतात.

पराशर ऋषींच्या आश्रमांत वाढत असतांना गजानन एक दिवस ऋषींना म्हणाला, "ज्यासाठीं मीं अवतार घेतला आहे त्या कार्याची — सिंदुर राक्षसाच्या वधाची वेळ जवळ आलेली आहे."

मग, गजानन शस्त्रास्त्रांनीं सज्ज होऊन आणि उंदरावर बसून सिंदुराच्या राजधानीपाशीं आला. त्यानें तिथून इतक्या भयंकर मोठ्यानें गर्जना करण्यास सुरुवात केली कीं, त्या गर्जनांमुळेंच सिंदुर आणि राजधानींतील सर्व राक्षस बेशुद्धच पडले.

सावध झाल्यावर कांहीं राक्षस, कोणी गर्जना केल्या, हें बघण्यासाठीं नगराबाहेर आले तेव्हां त्यांना उंदरावर बसलेली गजाननाची बालमूर्ति दिसली. राक्षसांच्या म्होरक्यानें विचारलें, "इतक्या भयंकर गर्जना करणारा तूं आहेस तरी कोण ?"

गजानन उत्तरला, " शंकर–पार्वतीचा पुत्र ! सिंदुराचा वध करण्यासाठीं मी आलों आहें."

त्या राक्षसांनीं धावत जाऊनच सिंदुराला ही हकीकत सांगितली. त्यावरोबर सिंदुर सज्ज होऊन गजाननाशीं लढण्यासाठीं आला.

सिंदुर समोर येतांच गजाननानें विराट स्वरूप धारण केलें. असंख्य डोकीं, असंख्य डोळे, असंख्य हात–पाय असलेली आणि आकाशापर्यंत भिडलेली ती प्रचंड मूर्ति बघून सिंदुर घाबरून गेला. पण कसाबसा धीर धरून त्यानें हातांतील तलवार गजाननावर वार करण्यासाठीं उचलली. पण त्याला तशी संधि न देतां गजाननानें त्याला आपल्या असंख्य हातांच्या मिठींत धरलें आणि तसेंच रगडून रगडून त्याचा चेंदामेंदा केला. राक्षसाच्या तांबड्या अंगाशीं अंग घासलें गेल्यामुळें गजाननाच्या अंगाचा रंगही तांबडा झाला. त्यामुळें त्याचें नांव ' सिंदुरवदन ' असें पडलें.

* * *

## उंदीर वाहन कसें मिळालें? : ४ :

इंद्राच्या सभेंत क्रौंच नांवाच्या एका गंधर्वाची लाथ वामदेव नांवाच्या ऋषींना चुकून लागली. पण ऋषींनीं त्याला भयंकर शाप दिला, " तूं उंदीर होशील ! "

क्रौंच गंधर्व उंदीर होऊन पराशर ऋषींच्या आश्रमाजवळ पडला. या उंदरानें आश्रमांतील पदार्थ खाऊन, वस्तूंची नासधूस करून ऋषींना त्रास द्यायला सुरुवात केली. तेव्हां

पराशरांच्या आश्रमांत वाढणाऱ्या गजाननानें फांस टाकून त्याला पकडलें. फांसांत अडकलेला उंदीर गजाननाकडे दयायाचना करूं लागला. गजाननाला दया येऊन त्यानें म्हटलें, "वर माग."

त्यावरोबर तो गर्विष्ठ उंदीर उत्तरला, "मला तूं कसला वर देणार? तूंच माग माझ्यापाशीं वर!"

"मग, तूं माझें वाहन हो!" असें म्हणून गजानन एकदम त्या उंदरावर स्वार झाला. तेव्हांपासून उंदीर हें गजाननाचें वाहन झालें.

* * *

## चंद्राला शाप :५:

उंदरासारखें विचित्र वाहन आणि त्यावर वसलेली गजाननाची विचित्र मूर्ति, असें तें ध्यान एकदां आकाश-मार्गानें जात असतां गजानन उंदरावरून गडगडला. त्या वेळीं आकाशांत उगवलेला चंद्र हंसून थट्टेनें कांहीं तरी वोलला. तेव्हां गजाननानें त्याला शाप दिला, "माझ्या रूपाला हंसतोस? जा, कुणीही तुझें तोंड पाहणार नाहीं! जे वघतील त्यांना पाप लागेल—त्यांच्यावर गंडांतरें येतील."

शापामुळें चंद्राचें तेज नष्ट झालें; लाजेनें तो लपून वसला.

अखेर सर्व देवांनीं गजाननाकडे चंद्राची रदबदली केली आणि स्वतः चंद्राकडूनही गजाननाची आराधना करविली.

प्रसन्न झालेल्या गजाननानें चंद्राला वर दिला, "वद्य चतुर्थीला तुझें दर्शन घेऊनच जें अन्न ग्रहण करतील त्यांच्या-वर माझी कृपा राहील. मात्र माझ्या शापाचा परिणाम म्हणून भाद्रपद शुद्ध चतुर्थीला तुझें तोंड कुणी बघणार नाहीं."

गजाननानें चंद्राची एक कला आपल्या मस्तकावर धारण केली तेव्हांपासून गजाननाला 'भालचंद्र' म्हणतात.

* * *

## दूर्वांचें माहात्म्य : ६ :

एकदां यमाच्या दरबारांत तिलोत्तमा नांवाच्या अप्सरेचें नृत्य चालू असतांना यमाच्या अंतःकरणांत पापवासना निर्माण झाली; त्याबरोबर तिथें एक भयंकर राक्षस उत्पन्न झाला. त्या राक्षसाच्या डोळ्यांतून आगीच्या ज्वाला भडकत होत्या. त्याचा आवाज कानठळ्या बसविणारा होता. चालू लागला कीं जमीन थरथरां कांपत असे. तो समोर दिसेल तें खाऊन टाकूं लागला. घावरलेले देव विष्णूकडे धांवले, विष्णूंनीं देवांना आश्वासन दिलें, "गजानन त्या राक्षसाचा नाश लौकरच करील."

विष्णूच्या या उद्गारांबरोबर गजानन मुलाच्या रूपानें प्रकट झाला. तवढ्यांत आपल्या डोळ्यांतील अग्नीनें सारे समुद्र आटवीत, पृथ्वीची जाळपोळ करीत तो राक्षस—अनला-

सुर त्याचें नांव–त्या ठिकाणीं आला. अनलासुराला बघतांच देव आणि ऋषी यांची पुनः पळापळ सुरू झाली.

पण, गजानन मात्र जागचा हालला नाहीं. राक्षस अंगावर चालून येत आहे असें बघतांच बालगजाननानें एकदम प्रचंड रूप धारण केलें आणि एका क्षणांतच अनलासुराला सबंधच्या सबंध गिळून टाकलें.

पण, प्रत्यक्ष आगच असलेला तो राक्षस पोटांत गेल्यामुळें गजाननाच्या सर्व अंगाची आग होऊं लागली. इंद्रानें गजाननाच्या डोक्यावर अमृत शिंपडलें, शीतल चंद्र ठेवला, विष्णूंनीं आपलें कमल दिलें, वरुणानें थंड पाणी ओतलें, शंकरांनीं सहस्रमुखी नाग त्याच्या अंगावर ठेवला; पण कांहीं केल्या त्याच्या अंगाची होणारी आग थंड होईना. तेव्हां अठ्यांयशी हजार ऋषींनीं प्रत्येकीं एकवीस अशा ताज्या, हिरव्यागार दूर्वा गजाननाच्या मस्तकावर वाहिल्या; त्याबरोबर मात्र त्याच्या अंगाची होणारी आग एकदम नाहींशी झाली.

तेव्हां गजानन म्हणाला, "कोणत्याही उपायानें नष्ट न होणारा माझ्या अंगाचा दाह या दूर्वांनीं नाहींसा झाला म्हणून आजपासून दूर्वा मला अत्यंत प्रिय आहेत. मला दूर्वा अर्पण करणाऱ्याचें सर्व पाप नष्ट होऊन असंख्य यज्ञयाग केल्याचें पुण्य त्याला लागेल."

* * *

एकमेकांना दिलेल्या शापांमुळें मधुसूदन नांवाच्या ब्राह्मणाला गाढवाचा, सुलभ नांवाच्या क्षत्रियाला बैलाचा आणि त्याची पत्नी समुद्रा हिला अमंगल चांडाळणीचा, असे पुढील जन्म मिळाले होते.

एका भाद्रपद शुद्ध चतुर्थीला ही चांडाळीण पावसापासून बचाव व्हावा म्हणून एका गजाननमंदिराच्या वळचणीला आसऱ्यासाठीं आली. तिथें शेकोटी करण्यासाठीं तिनें खूप गवत जमविलें, त्या गवतांत दूर्वा होत्या. तेवढ्यांत सोसाट्याचा वारा सुटून तिच्या हातांतील दूर्वांतील एकच दूर्वा उडाली आणि नेमकी मंदिरांतील गजाननाच्या डोक्यावर जाऊन पडली. तेवढ्यांत गाढवरूपी मधुसूदन आणि बैल-रूपी सुलभ त्या ठिकाणीं आले आणि चांडळणीनें जमविलेल्या गवतासाठीं त्यांची लट्टा लट्टी सुरू झाली. त्या लट्टालट्टींत दोघांच्या तोंडांतील गवतांतील दूर्वा उडून गजाननाच्या डोक्यावर जाऊन पडल्या.

बरीच रात्र झाल्यावर मंदिरांतील पुजारी आणि उपासक झोपलेले बघून ती चांडाळीण देवापुढील नैवेद्य खाण्यासाठीं आंत शिरली. तिच्या मागोमाग बैल व गाढवही घुसले. तेव्हां ती चांडाळीण त्यांना काठीनें पिटाळूं लागली. त्या गडबडीनें लोक जागे झाले आणि काठ्या हातीं घेऊन त्या तिघांनाही पिटाळण्यासाठीं धांवले; तेव्हां बैल, गाढव,

चांडाळीण हीं तिघें पळूं लागलीं. योगायोगानें पळतांना त्यांना प्रदक्षिणा घडली.

देवाला चांडाळणीचा विटाळ झाला म्हणून भक्तांनीं पुन: गजाननाची यथासांग पूजा केली.

तेवढ्यांत चमत्कार असा झाला कीं, गजाननाच्या आज्ञे-वरून गणेश लोकांतून विमान आलें. चांडाळीण, बैल, गाढव यांना नेण्यासाठीं तें विमान आलें आहे हें पाहून भक्तांना आश्चर्याचा धक्काच बसला. पण गजाननाच्या गणांनीं खुलासा केला, " आज भाद्रपद शुद्ध चतुर्थीच्या दिवशीं या तिघांकडून गजाननाच्या मस्तकावर दूर्वा पडल्या, त्यांना गजाननाची प्रदक्षिणा घडली आणि त्यांच्यामुळेंच त्याची दोनदां पूजा झाली म्हणून गजाननानें त्यांचा उद्धार केला आहे. "

* * *

## इंद्राचा गर्व उतरविला :८:

कौंडिण्य नांवाच्या एका गणेशभक्तानें आपली पत्नी आश्रया हिला एक दूर्वांकुर देऊन त्याच्या भारंभार सोनें इंद्राकडून आणण्यासाठीं पाठविलें.

इंद्राच्या आज्ञेवरून कुबेरानें तराजूच्या एका पारड्यांत तो दूर्वांकुर टाकून दुसऱ्या पारड्यांत सोन्याची लगड टाकली. पण दूर्वांकुराचें पारडें जडच राहिलें. तेव्हां कुबेर आणखी सोनें टाकूं लागला. भांडारांतील सर्व सोनें, रुपें,

रत्नें संपलीं तरीही दूर्वांकुराचें पारडें जडच राहिलें. अखेर स्वतः कुबेर, ऐरावतासह इंद्र, विष्णु, शंकर, इतर देव दुसऱ्या पारड्यांत बसले तरीही दूर्वांकुराचें पारडें जडच राहिलें.

असें दूर्वांचें माहात्म्य आहे.

* * *

## शमी आणि मंदार :९:

धौम्य ऋषींचा पुत्र आणि शौनक ऋषींचा शिष्य मंदार ह्याला और्व नांवाच्या वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मणाची शमीका नांवाची मुलगी दिलेली होती.

एकदां, शमीका–मंदार हें जोडपें आपल्या आश्रमांत बसलेलें असतांना गजाननाचा परमभक्त भ्रुशुंडी हा तेथें आला. भ्रुशुंडीनें इतकी कडक तपश्चर्या केली होती कीं तो शरीरानेंही गजाननासारखा झाला होता. म्हणजे त्याचें पोट मोठें असून नाकाच्या जागीं सोंड होती.

भ्रुशुंडीचें विचित्र रूप बघून तें जोडपें हंसलें. त्याबरोबर भ्रुशुंडीनें शाप दिला, "तुम्ही मला विनाकारण हंसलांत म्हणून कांटेरी झाडें व्हाल. पक्षीसुद्धां तुमच्या आसपास येणार नाहींत."

भ्रुशुंडीच्या शापामुळें शमीका आणि मंदार यांचें झाडांत रूपांतर झालें.

ही गोष्ट शौनक आणि और्व यांना समजली तेव्हां त्या दोघांनीं बारा वर्षें तपश्चर्या करून गजाननाला प्रसन्न करून घेतलें आणि, "मंदार आणि शमीका ह्यांना पुनः पूर्वीं-सारखीं मनुष्य रूपें मिळावींत" असा वर मागितला.



शमी आणि मंदार

पण, गजानन म्हणाला, "माझ्या भक्ताचा शाप खोटा होणार नाहीं. पण आजपासून मी मंदार वृक्षाच्या मुळांपाशीं रहात जाईन; त्यामुळें तो वृक्ष त्रिभुवनांत मान्यता पावेल. जो

भक्त मंदार वृक्षाखालीं माझी मूर्ति स्थापन करील आणि शमीच्या पानांनीं व दूर्वांनीं माझें पूजन करील त्याची मनो-कामना मी पूर्ण करीत जाईन. "

* * *

## मृत पुत्र जिवंत झाला : १० :

प्रियव्रत नांवाच्या राजाला प्रभा आणि कीर्ति अशा दोन राण्या होत्या. पण, राजाचें प्रेम प्रभावरच असून तो कीर्तीला स्वत:जवळही येऊं देत नसे. त्यामुळें कीर्ति आत्महत्या करण्याचा विचार करूं लागली.

पण, सुदैवानें, पुरोहिताकडून तिला गजाननाच्या उपासनेचा सल्ला मिळाला. तेव्हां आत्महत्या न करतां कीर्ति गजाननाची उपासना मनोभावें करूं लागली. तिनें मंदार वृक्षाच्या लांकडाची गणपतीची मूर्ति तयार करून घेतली व नित्यनियमानें दूर्वा आणि शमी वाहून ती गजाननाची पूजा करूं लागली.

उपासनेच्या पुण्याच्या प्रभावानें कीर्ति पुन: प्रियव्रताला आवडूं लागली आणि त्यानंतर तिला एक सुंदर मुलगा झाला.

सवतीमत्सरानें जळफळूं लागलेल्या प्रभा राणीनें एक दिवस दहींभातांत विष कालवून कीर्तीच्या मुलाला तो भात खाऊं घातला. तो मुलगा तत्काळ मरण पावला.

कीर्ति अत्यंत शोक करूं लागली. त्याच वेळीं तिच्या सुदैवानें गृत्समद ऋषि वाटेनें जात होते. राणीचा शोक ऐकून ते तिथें आले आणि म्हणाले, "शोक कशाला करतेस ? शमीपत्रांनीं तूं गजाननाची पूजा केली आहेस. तें पुण्य मुलाला दे."

ऋषींच्या सल्ल्याप्रमाणें कीर्तीनें आपलें पुण्य मुलाला देण्याचा संकल्प सोडतांच तो मुलगा जिवंत झाला.

अनुक्रम 33563
विभाग
क्रमांक
नों. दि.

* * *

## पापी कोळी ऋषि झाला

मंदार आणि शमीका यांना शाप देणारा गजाननभक्त भ्रुशुंडी पूर्वी कोण होता, माहीत आहे ?

ज्याचें नांवच दुष्ट आहे असा एक कोळी नांवाप्रमाणेंच दुष्ट होता. तो चोऱ्या करी, जुगार खेळत असे, दारू पीत असे. शिवाय, वाटसरूंना लुबाडतांना खून करण्यास देखील मागेंपुढें पहात नसे.

एकदां हा कोळी शिकार करतांना एका श्वापदाचा पाठलाग करीत करीत खूप दूर अंतरावर गेला. पण, तें श्वापद तर त्याच्या हातीं लागलें नाहींच, पण तो मात्र अत्यंत थकून गेला. जवळच एक उत्तम सरोवर बघून त्याला आंघोळ

करण्याची इच्छा झाली. तें सरोवर म्हणजे गणपतीचें एक पवित्र तीर्थच होतें.

आंघोळ करून परतलेला दुष्ट वाटेनें जात असतांना त्याला कोणी तरी गजाननाच्या नांवाचा जप करीत असल्याचा आवाज ऐकूं आला. मूळस्वभावाप्रमाणें शस्त्र उपसून तो त्या आवाजाच्या दिशेनें धांवला. पण प्रत्यक्ष त्या व्यक्तीवर वार करण्यासाठीं त्यानें हात उचलला तेव्हां चमत्कार झाला.

अजाणतां कां होईना गजाननाच्या तीर्थाचें स्नान घडल्यामुळें दुष्टाच्या मनांत सद्भाव जागृत झाला होता. शिवाय, नामस्मरण करणारी व्यक्ति गजाननभक्त मुद्गल ऋषिच होते. दुष्टाच्या हातची तलवार एकदम गळून पडलीच, पण त्याचे हातही ऋषींपुढें जोडले गेले. तो म्हणाला, "महाराज मला उद्धाराचा मार्ग दाखवा."

मुद्गल ऋषींनीं दुष्टाला गजाननाच्या मंत्राची दीक्षा दिली. त्यांनीं स्वतःजवळची काठी एका जागीं रोवली आणि म्हटलें, "या काठीला पालवी फुटेपर्यंत तपश्चर्या कर."

दुष्टानें ऋषींच्या आज्ञेप्रमाणें अनेक वर्षें तपश्चर्या केली. त्या काठीला पालवी फुटली, त्याच्या अंगाभोंवतीं वारुळें वाढलीं, झुडपें वाढलीं तरी त्याची तपश्चर्या चालूच राहिली. तो गजाननाशीं इतका एकरूप झाला कीं, त्याला प्रत्यक्ष गजाननाचें रूप मिळालें.

IRBK-0100880

प्रदीर्घ कालानंतर मुद्गल ऋषि त्या ठिकाणीं आले तेव्हां त्यांनीं कोळ्याच्या अंगावरचीं वारुळें काढून टाकलीं. वारुळांतून पुनर्जन्म झाला म्हणून आणि नाकाच्या जागीं सोंड वाढली म्हणून त्यांनीं त्याचें नांव भ्रुशुंडी ठेवलें.

भ्रुशुंडीनें मुद्गलांपासून एकाक्षरी मंत्राचा उपदेश घेऊन पुनः तपश्चर्या केली तेव्हां प्रसन्न झालेल्या गजाननानें त्याला वर दिला, "तूं तपश्चर्या केलेली जागा नामल क्षेत्र म्हणून प्रसिद्ध होईल. तूं स्थापन केलेल्या माझ्या मूर्तीच्या नुसत्या दर्शनानें सर्व इच्छा पूर्ण होतील. या जागीं तप करील त्याला तपाचें फळ फार लौकर मिळेल."

* * *

## संकष्ट चतुर्थी व्रताचा प्रभाव : १२ :

भ्रुशुंडीनें पूर्वीच्या आयुष्यांत केलेल्या पापांमुळें आणि स्वतःच्याही पापांमुळें त्याचीं मातापितरें आणि पूर्वज यांना कुंभीपाक नरकांत खितपत पडावें लागलें होतें. ही गोष्ट भ्रुशुंडीला नारदांकडून समजली.

भ्रुशुंडीनें तत्काळ हातीं उदक घेऊन संकल्प सोडला, "संकष्ट चतुर्थी व्रताच्या एका दिवसाचें पुण्य मी माझ्या पूर्वजांना देत आहे."

भ्रुशुंडीनें संकल्प सोडतांच तिकडे कुंभीपाक नरकांत खितपतणाऱ्या त्याच्या पूर्वजांना बाहेर काढण्यांत आलें आणि विमानांतून स्वर्गांत पाठविण्यांत आलें.

* * *

ELC

# अंगारकी चतुर्थीचें महत्त्व कां ? 

मंगळवारीं येणाऱ्या वद्य चतुर्थीला अंगारकी म्हणतात.

भारद्वाज नांवाच्या ऋषीचा मुलगा पृथ्वीनें वाढविला. त्याच्या अंगाचा वर्ण तांबडा होता. मौंजीबंधन झाल्यावर ऋषींनीं त्याच्याकडून वेदाध्ययन करविलें.

या मुलानें पित्यापासून गजाननाच्या मंत्राचा अनुग्रह घेऊन नर्मदा नदीच्या काठीं असंख्य वर्षें तपश्चर्या केली.

गजानन प्रसन्न झाल्यावर त्यानें वर मागितला, "स्वर्गांत राहून मला अमृत प्यायला मिळावें. माझें नांव तिन्ही लोकांत प्रसिद्ध व्हावें. ज्या चतुर्थीला तूं मला प्रसन्न झालास ती चतुर्थी विशेष कल्याणप्रद ठरावी."

गणपति म्हणाला, "तथास्तु तूं 'मंगल' या नांवानें प्रसिद्ध होशील. तुझा वर्ण तांबडा म्हणून तुला 'अंगारक' हेंही नांव मिळेल. त्याचप्रमाणें तुला पृथ्वीनें–भूमीनें–वाढविला म्हणून तुला 'भौम' ही म्हटलें जाईल."

अंगारकानें जिथें गजानन प्रसन्न झाला त्या ठिकाणीं गजाननाची मूर्ति स्थापली, तें स्थान पारनेर नजीकचें "चिंतामणि क्षेत्र' होय.

अनुक्रम ३३८८३
विभाग
क्रमांक ३०३२
नों. दि. १८।१०।५
ग्रंथालय

## छान छान अन् गमतीदार गोष्टींची पुस्तकें

राजा हरिश्चंद्र
राजा अंबरीश
उषा
मगध देशीचा राजा
प्राचीन सुंदर गोष्टी
संत तुलसीदास
सुकन्या
संत ज्ञानेश्वर
छत्रपति शिवाजी
संत नामदेव
संताच्या गोष्टी
भीम
गोपाल कृष्ण
सती द्रौपदी
नऊ नाथांच्या गोष्टी
राजा नल आणि दमयंती

महर्षि आस्तिक
राजा दक्ष
भीष्म
हिमगौरी आणि सात बुटके
राजा विश्वामित्र
संत एकनाथ
लव - कुश
जादूचा दिवा
संत - कथा
संत - रामदास
संत जयदेव
बिरबल : भाग १ ते ६
श्रीरामचंद्र
धाडसी राजपुत्र
लोकमान्य टिळक
राजा भरत

जादूगार परी : अलीबाबा आणि चाळीस चोर : राणी लक्ष्मीबाई
राजपुत्र खुदादाद * जादूचा घोडा

---

| | | |
|---|---|---|
| दोन राजपुत्र : | पृष्ठें ४८ | मूल्य ४० न.पै. |
| तीन राजपुत्र : | ,, ४८ | ,, ४० न.पै. |
| दर्यावर्दी सिंदबाद : | ,, ४८ | ,, ६ आणे |

**श्रीराम प्रकाशन, ठाकुरद्वार : मुंबई क्र. २**

मुखपृष्ठ छपाई : आशा प्रिंटरी, मुंबई ४.